महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ८० वी बैठक

| | |
|---|---|
| बैठक दिनांक | दिनांकः- ५ जुलै -२०२३ |
| ठिकाण | हाॅटेल विट्स, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद |
| वेळ | सकाळी ११.०० वाजता |

## बैठकीचे इतिवृत्त

**विषय क्रमांक. १: -** सन्माननीय सदस्यांच्या रजेबाबत.

**ठराव क्रमांक १: -** **मा. सदस्य श्री. फारुक शाह, विधानसभा सदस्य हे मा. अध्यक्ष महोदय यांना पुर्वकल्पना देऊन बैठकीस गैरहजर होते. सबब, सन्माननीय सदस्य यांची रजा मंजूर करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २: -** दिनांक २९.०५.२०२३ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत

**ठराव क्रमांक २: -** **दिनांक २९.०५.२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

## (नोंदणी विभाग)

**विषय क्रमांक ३:-** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार नोंदणी प्रस्तावांना मान्यता देणे बाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या नोंदणीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण (५१) प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे :-

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ABD/691/2018 | Abdul Kadar Arbi Madrasa-o-Masjid | At. Khuldabad Road, Kadar Colony | Phulambri | Phulambri | Aurangabad |
| 2 | ABD/406/2021 | Madina Masjid wo Arbi Madarsa | At. Ajwa Nagar | Waluj | Gangapur | Aurangabad |
| 3 | ABD/193/2022 | Masjid Saleemiya | | Sillod | Sillod | Aurangabad |
| 4 | ABD/750/2022 | Rahmaniya Masjid | | Apatgaon | Aurangabad | Aurangabad |

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | ABD/889/2022 | Madrasa Arbiya Aziziya | At. S. No. 388/1 | Sillod | Sillod | Aurangabad |
| 6 | ABD/398/2023 | Masjid | | Warkhedi Bk. | Soyegaon | Aurangabad |
| 7 | JLN/457/2019 | Masjid Huseniya | | Nidhona | Jalna | Jalna |
| 8 | JLN/614/2022 | Jama Masjid Wa Madarsa | | Sawangi | Jafrabad | Jalna |
| 9 | JLN/261/2023 | Madina Masjid | | Gawali Pokhri | Jalna | Jalna |
| 10 | JLN/262/2023 | Masjid Salman Farsi | | Rammurti | Jalna | Jalna |
| 11 | PBN/118/2023 | Hasnain Madarsa vo Masjid-E-Quadaria | At. Jaitpur Mohalla | Pathri | Pathri | Parbhani |
| 12 | PBN/119/2023 | Umar Farookh Madarsa-Vo-Masjid | At. Tayyab Nagar | Pathri | Pathri | Parbhani |
| 13 | NDD/893/2022 | Sayyed Ahmed Aalam Qadri Deeni Madarsa wo Masjid | At. Plot No. 22, GP. No. 767, Gut No. 243 | Malegaon | Ardhapur | Nanded |
| 14 | NDD/129/2023 | Madarse Arabia And Masjid e Abu Ubeda Bin Jarrah | Khusro Nagar, Deglur Naka | Nanded | Nanded | Nanded |
| 15 | BED/255/2018 | Madarsa Khuba | At. Samta Colony | Majalgaon | Majalgaon | Beed |
| 16 | BED/256/2019 | Madarsa Aqsa | Dahiphal | Dahiphal (Chincholi) | Beed | Beed |
| 17 | BED/652/2019 | Masjid-wa-Madarsa Kazi Ahmed Mohiuddin | At. Sultan Nagar | Ashti | Ashti | Beed |
| 18 | BED/629/2022 | Madina Masjid | | Hatola | Ashti | Beed |
| 19 | BED/631/2022 | Masjid Ibrahim | | Sawargaon | Ashti | Beed |
| 20 | BED/427/2023 | Makka Masjid | At. Momin Pura | Beed | Beed | Beed |
| 21 | PUN/281/2022 | Masjid Imam-E-Aazam Abu Hanifa Rahmatulla Alaih | At. Noor Park | Kondwa (Khurd) | Haveli | Pune |
| 22 | STR/117/2023 | Dargah Masjid Trust | | Phaltan | Phaltan | Satara |

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 23 | NSK/499/2018 | Hussaini Masjid | | Gondegaon | Niphad | Nashik |
| 24 | NSK/931/2022 | Masjid O Madrasa Huzur Mohaddis-e-Aazam Hind Mufti Sayyed Mohammed Ashrafi (Kichawachwi) | | Sangameshwar | Malegaon | Nashik |
| 25 | NSK/939/2022 | Masjid O Madrasa Aala Hazrat Sayyed Ali Husain Ashrafi (Kichawchwi) | | Sangameshwar | Malegaon | Nashik |
| 26 | NSK/1035/2022 | Masjid-O-Madrasa Siddique-O-Ameen Trust | At. S. No. 114/1/4, P. No. 17 & 18, Iqra Nagar | Malegaon | Malegaon | Nashik |
| 27 | ADR/161/2023 | Jama Masjid | | Khedle Parmanand | Newasa | Ahmednagar |
| 28 | JGN/164/2012 & 488/2022 | Masjid-vo-Madarsa-e-Umar Farooq | | Muktainagar | Muktainagar | Jalgaon |
| 29 | JGN/352/2017 | Mast Kalandar Peer Panch | | Nagar Devla | Pachora | Jalgaon |
| 30 | JGN/614/2018 | Falah-E-Darain Masjid and Madarsa | | Hingona | Yawal | Jalgaon |
| 31 | JGN/886/2018 | Masjid-O-Madrasa Ahle Sunnat Faizane Atae Khwaja | At. S.No. 17/2/1+17/2/2, Plot No. 16, Ali Raza Nagar | Bhusawal | Bhusawal | Jalgaon |
| 32 | JGN/221/2020 | Noorani Masjid & Ashurkhana Dargah Ramjanshawali | | Jalod | Amalner | Jalgaon |
| 33 | JGN/351/2020 | Muslim Panch Kabrastan | | Mamalde | Chopda | Jalgaon |
| 34 | JGN/418/2022 | Masjid-E-Bilal wo Madarasa | | Raver | Raver | Jalgaon |
| 35 | JGN/177/2023 | Peer Hazrat Sayyed Fazal Ali (Rh.) | At. Babuji Pura | Yawal | Yawal | Jalgaon |
| 36 | JGN/185/2023 | Madarsa Madinatul Uloom | | Pahur | Jamner | Jalgaon |
| 37 | JGN/511/2023 | Masjid-E-Shahe Jila | At. Gendalal Mill, Lakshmi Nagar | Jalgaon | Jalgaon | Jalgaon |

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 38 | JGN/503/2023 | Jama Masjid and Arbi Masjid | | Sarve Bk. | Pachora | Jalgaon |
| 39 | JGN/461/2023 | Jama Masjid and Sayed Shaadal Shah Wali Dargah | | Bhamnod | Yawal | Jalgaon |
| 40 | JGN/316/2023 | Madni Arbi Madarsa wa Masjid | | Shewale | Pachora | Jalgaon |
| 41 | JGN/315/2023 | Tajushshariya Masjid & Madarsa | | Khirdi Khurd | Raver | Jalgaon |
| 42 | DLE/59/2022 | Chand Shah Wali Gaiban Shah Wali | At. Gut No. 470 | Bamhane | Sindkhede | Dhule |
| 43 | DLE/153/2023 | Anwaar-E-Sayyedi Anjuman | At. Chand Tara Chowk, Maulvi Ganj | Dhule | Dhule | Dhule |
| 44 | NDR/661/2013 & 728/2018 | Muslim Punch Masjid & Madarsa, Kabrastan | | Dhanora | Nandurbar | Nandurbar |
| 45 | NDR/347/2022 | Masjid-e-Yusuf | At. Hariyali State, Plot No. 56, 57 and 80, S. No. 57/1+54/2 | Maloni | Shahda | Nandurbar |
| 46 | AMT/755/2014 | Madina Masjid and Madarsa Committee | At. Mokaspura | Morshi | Morshi | Amravati |
| 47 | AMT/989/2022 | Madeena Masjid | | Darapur | Daryapur | Amravati |
| 48 | AKL/128/2017 | Noori Maa Havwa Sunni Madarsa-o-Masjid | At. S. No. 90/2, Plot No. 52, 53, 54, Noori Plot, Bhagat Wadi, Galli No. 5 | Akola | Akola | Akola |
| 49 | AKL/825/2018 | Mohammadiya Madarsa & Masjid | | Ramkhed | Murtizapur | Akola |
| 50 | AKL/753/2022 | Saiyyed Shah Kabeer Badshah Yanchi Dargah Kabeerpura Akot | At. Kabeer Pura | Akot | Akot | Akola |
| 51 | NGP/393/2022 | Jama Masjid | | Aroli | Mauda | Nagpur |

उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली उपरोक्त प्रकरणात मा. कोर्टात कोणतेही वाद लवाद प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले नाही.

**ठराव क्रमांक ३:-** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार उपरोक्त एकुण (५१) नोंदणी च्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (५१) नोंदणीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे.**

## (आस्थापना विभाग)

**विषय क्रमांक ४:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या पदभरतीबाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकरीता दि. २४.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्यान्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या आस्थापनेवर एकुण १७९ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. मंडळाच्या आस्थापनेवरील रिक्त पदांवर भरती करण्यास मान्यता देणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. ०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये निवड समितीस विनंती केली होती. या बाबत दि. ०१.०३.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत निवड समितीने खालील पदे भरण्यास सहमती प्रदान केलेली आहे.

| अ. क्र. | संवर्ग | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | जिल्हा वक्फ अधिकारी/अधिक्षक | २५ |
| २ | कनिष्ट लिपीक | ३१ |
| ३ | लघु टंकलेखक | १ |
| ४ | कनिष्ट अभियंता | १ |
| ५ | विधी सहाय्यक | २ |
| | एकुण | ६० |

निवड समितीने दिलेल्या मान्यतेचे अनुषंगाने, उपरोक्त पदांची भरती बाबत I.B.P.S.या संस्थे मार्फत जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे. सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपरोक्त पदांसाठी कमाल वयो मर्यादा ३८ वर्ष इतकी आहे, तथापि, अपवादात्मकत पात्रता किंवा अनुभव किंवा दोन्ही बाळगुन असणा-या उमेदवारांच्या बाबतीत वयाची अट /अनुभवाचा कालावधी यामध्ये सुट देण्याचे अधिकार वक्फ मंडळास आहेत.

उपरोक्त बाबी विचारात घेता, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या नियमित सेवेत असलेल्या कर्मचारी प्रस्तावित भरती प्रक्रियेमध्ये भाग घेतल्यास त्यांना कमाल वयोमर्यादेत १० वर्षांची सुट देउन त्यांच्यासाठी कमाल वयोमर्यादा ४८ वर्ष इतकी ठेवण्याचे प्रस्तावित आहे. मान्य झाल्यास त्याप्रमाणे जाहिरात देण्यात येईल.

**ठराव क्रमांक ४:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या प्रस्तावित पदभरतीबाबत सन २०१८ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवाभरती विनियमान्वये प्राप्त अधिकारानुसार मंडळाने खालील ठराव पारित केले :-**

**१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या नियमित आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांसाठी प्रस्तावित पदभरतीमध्ये निवड प्रक्रियेमध्ये भाग घेणा-यासाठी १० वर्षांची सूट देऊन कमाल वयोमर्यादा ४८ वर्षे इतकी करण्यात येत आहे.**

**२) जिल्हा वक्फ अधिकारी या पदासाठी अनुभवायाची अट जाचक असून त्यामुळे खुली स्पर्धा होणार नाही. सबब, जिल्हा वक्फ अधिकारी पदासाठी केवळ शैक्षणिक पात्रतेची अट ठेवून अनुभवाची अट शिथिल करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक ५:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कर्मचा-यांना महागाई भत्ता अनुज्ञेय करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करण्यात येते. महागाई निर्देशांकाच्या अनुषंगाने राज्य शासनाकडुन वेळोवेळी राज्य शासकिय व इतर पात्र कर्मचा-यांना महागाई भत्ता देण्यात येतो. साधारणतः महागाई भत्यामध्ये दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै पासून महागाई भत्ता वाढविण्यात येतो. राज्य शासनाकडुन या संदर्भात निर्गमित होणा-या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कर्मचा-यांना महागाई भत्ता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर मंजूर करण्यात येतो.

राज्य शासनाकडुन वाढविण्यात येणारा महागाई भत्ता मंडळातील कर्मचा-यांना लागू करणे बाबत वक्फ मंडळाची सहमती मिळण्यास्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ५:-** **राज्य शासनाकडून महागाई भत्त्याबाबत निर्गमित करण्यात येणा-या शासन निर्णयातील तरतूदी (महागाई भत्त्याचे दर व लागू करावयाचा दिनांक) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कर्मचा-यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. महागाई भत्त्यासंदर्भात यापुढे निर्गमित होणा-या शासन निर्णयांना देखील सदर मान्यता लागू राहील.**

**विषय क्रमांक. ६: -** **Commercial proposal for implementing digital platform for Audit Module and Internet leased line based Video conferencing at Various offices of WAQF Board.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या वक्फ संस्थांचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४७ येथे विहीत पध्दतीनुसार लेखा परिक्षण करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत वक्फ संस्था त्यांच्या स्तरावर वक्फ संस्थांचे लेखा परिक्षण करुन सदर

अहवाल वक्फ मंडळास सादर करतात. सदर कार्यवाही करण्यासाठी राज्यभरातून विश्वस्तांना मुख्यालयात दरवर्षी यावे लागते.

सदर कामकाज ऑनलाईन पध्दतीने करुन सदर सेवा वक्फ संस्थांना सहजतेने उपलब्ध करुन देण्यासाठी Online Audit Module विकसित करावयाचे प्रस्तावित आहे. तसेच राज्यामध्ये जिल्हास्तरावर नविन कार्यालये सुरु करण्यात येत असून जुन्या कार्यालयामध्ये देखील माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार होणा-या सुनावण्या देखील Video Conferencing च्या माध्यामातून घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी Internet leased line based video conference service मुख्यालय व जिल्हा कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. या संदर्भात केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाच्या अखत्यारितील रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड या मंडळाकडुन दि. १९.०६.२०२३ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असुन त्या बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहेः-

| Sr. No. | Description | Amount (Inclusive of taxes) |
|---|---|---|
| 1 | **Part -1 (Development of Digital Platform for Audit Module )**<br>1. Audit Module<br>a. Budget Module<br>b. Yearly Return Feature<br>c. Account Feature<br>2. One onsite technical person for three years | Rs. 2,24,00,000/- |
| 2 | Part -2 ( Provisioning of internet leased line based video conference service )<br>Subscription charges for 11 district offices for 5 years, installation, Hardware,etc | Rs. 1,48,48,020/- |
| | Total | Rs. 4,12,80,020/- |

उपरोक्त प्रमाणे रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांच्याकडुन प्राप्त प्रस्ताव शासनाच्या पॅनलवर उपलब्ध IT सल्लागार संस्थेकडुन तपासून खुल्या निविदा माध्यमातून सेवा पुरवठादाराची निवड करण्यास मंडळाच्या मान्यतेस्तव सादर

**ठराव क्रमांक ६:-** **IT सल्लागार संस्थेच्या सहायाने खुल्या निविदा माध्यमातून या कामासाठी सेवा पुरवठादाराची निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामासाठी आवश्यक IT सल्लागार शासनमान्य संस्थांकडून कंत्राटी तत्वावर घेण्यासाठी देखील मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक. ७: - सातारा व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये नविन जिल्हास्तरीय वक्फ कार्यालय उघडण्यासाठी कार्यालयीन खर्च करण्यास सहमती प्रदान करणे बाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकरीता दि. २४.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्यान्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अखत्यारित एकुण २७ जिल्हा वक्फ कार्यालय मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सातारा व रत्नागिरी/सिंधुदुर्ग येथे दोन जिल्हा वक्फ कार्यालयासाठी जागा निश्चिती केलेली आहे. सदर जागेवर कार्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक फर्निचर व इतर साहित्य खरेदी करावयाचे असल्याने सदर खर्च करण्यास वक्फ मंडळाची सहमती प्रदान करण्यास्तव प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. सदर खरेदी विहीत नियमांचे पालन करुन करण्यात येईल.

**ठराव क्रमांक ७:-** **सातारा व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये नविन जिल्हास्तरीय वक्फ कार्यालय उघडण्यासाठी कार्यालयीन खर्च करण्यास वक्फ मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे. तसेच दिनांक २४.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयात नमूद सर्व जिल्हा वक्फ कार्यालयांसाठी आवश्यक कार्यालयीन खर्च करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. वक्फ कार्यालयासाठी प्रत्येकी रु. १० लाख पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर देण्यात यावी. तद्नंतर सदर खर्चास मंडळाची कार्योत्तर मान्यता घ्यावी. प्रत्येकी रु. १० लाखाच्या वरील खर्चास मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.**

## (चौकशी विभाग)

**विषय क्रमांक. ८: - वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(ए) नुसार योजना मंजूरीसाठीच्या प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या योजना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

| Sr No. | File No | District | Name Of Institution | Remark |
|---|---|---|---|---|
| 1. | 69/753/2022 | Solapur | Munnawar Masjid Va Arbi Madarsa Solapur | |
| 2. | 69/942/2022 | Solapur | Jama Masjid , at Akkalkot Tq. Akkalkot Dist Solapur | |
| 3. | 69/385/2021 | Akola | Jumma Masjid Malegaon Bazar, Tq. Telhara Dist Akola | |
| 4. | 69/363/2022 | Sangli | Masjid Dev, Umadi, Tq. Jat Dist Sangli | |
| 5. | 69/717/2022 | Aurangabad | Sayed Sadat, at Nageshwar Mandir, Aurangabad | |

| Sr No. | File No | District | Name Of Institution | Remark |
|---|---|---|---|---|
| 6. | 69/920/2023 | Raigad | Jama Masjid Trust, Devali Tq. Mangaon Dist Raigad | |
| 7. | 69/921/2022 | Raigad | Mohammadiya Jama Masjid Arbi Madarsa Trust, at Bazar Tep, June Mangaon Tq. Mangaon Dist Raigad | |
| 8. | 69/910/2022 | Raigad | Jamatul Muslimeen Ambat, at Ambat Tq. Mhasala Dist Raigad | |
| 9. | 69/26/2023 | Ahmednagar | Kanohba Dev Urf Hazrat Baba Ramzan Dargah Waqf, at Guha Tq. Rahuri Dist Ahmednagar | |
| 10. | 69/24/2023 | Ahmednagar | Masjid Waqf at Guha Tq. Rahuri Dist Ahmednagar | |
| 11. | 69/311/2022 | Palghar | Madarsa Gausiya Jama Masjid, at Vasai phata, village Vasai Tq. Vasai Dist Palghar | |
| 12. | 69/236/2021 | Aurangabad | Muslim Kabrasta, Aurangabad Tq. Aurangabad Dist Aurangabad | |
| 13. | 69/891/2022 | Beed | Idgah and Graveyard village Rajuri Tq. Dist Beed | |
| 14. | 69/44/2018 | Jalna | Dargah Hazrat Janullah Shah Khankah Masjid and Kabrastan, Jalna Tq Dist Jalna | *टिप |
| 15. | 69/763/2015 | Beed | Idgah and Graveyard at Wadwani Tq. Wadwani Dist Beed | |
| 16. | 69/846/2022 | Nashik | Madarsa –E- Anwarul Uloom and Masjid at Mangal Nagar, Satana Tq. Baglan Dist Nashik | |
| 17. | 69/695/2022 | Nagpur | Jamiya asjid Tajul Auliya (Besa), At. Plot No.8, Kh.No.66/A-1 & 66/13, PH.No.38, Gramp Panchayat Besa, Beltardi, Village. Nagpur, Tq. & Dist, Nagpur | |
| 18. | 69/225/2023 | Aurangabad | Masjid E Nawab and Juma Khan, At. S. No. 225/12/4, Sumaira Garder, Village. Harsool, Tq. & Dist. Aurangabad | |
| 19. | 69/261/2021 | Osmanabad | Masjid Mulla Galli, Village. Jewali, Tq. Lohara, Dist. Osmanabad | |
| 20. | 69/322/202 | Latur | Buland Muslim Kabrastan, At. Sanat Nagar (Hanumantwadi), Village. Latur, Tq. & Dist,Latur | |
| 21. | 69/294/2021 | Parbhani | Masjid (Raj Mohalla), At. Raj Mohalla, Village. Gangakhed, Tq. Gangakhed, Dist. Parbhani | |
| 22. | 69/415/2017 | Amravati | Sunnat Jamati Dargah Masjid, At Daryabad, Post Wadegaon Fatepur, Village. Daryabad, Tq. Achalpur, Dist.Amravati | |
| 23. | 69/550/2021 | Amravati | Jama Masjid, At. Benode, Village. Warud, Tq. Warud, Dist. Amravati | |
| 24. | 69/449/2021 | Sangli | Uran Muslim Kabrastan Trust, At. Shivaji Chowk, Village. Uran Islampur, Tq. Walwa, Dist. Sangli | |
| 25. | 69/75/2021 | Dhule | Masjid Madarsa and Khankah Maulana Mohammad Qamaruzzama, At. Wasiabad, Tq. & Dist. Dhule | |
| 26. | 69/306/2021 | Jalgaon | Madarsa Gulshan E Raza Shendurni, Village. Shendurni, Tq. Jamner, Dist. Jalgaon | |
| 27. | 69/461/2021 | Jalgaon | Arbi Masarsa o Masjid Trust, At. Masoomwadi, Village Mehroon, Tq. & Dist. Jalgaon | |
| 28. | 69/464/2021 | Jalgaon | Dargah Hazrat Shaikh Gulab Alias Ashiqullah Shah Nizami, Village. Shendurni, Tq. Jamner, | |

| Sr No. | File No | District | Name Of Institution | Remark |
|---|---|---|---|---|
| | | | Dist. Jalgaon | |
| 29. | 69/10/2022 | Jalgaon | Bagwan Masjid, Village. Pimpagaon, Tq. Pachora, Dist. Jalgaon | |
| 30. | 69/303/2022 | Jalgaon | Masjid Hazrat Bilal Trust, At. Lucky Complex Near S.T Stand, Village, Chalisgaon, Tq. Chalisgaon, Dist. Jalgaon | |
| 31. | 69/386/2022 | Jalgaon | Noorani Masjid o Kabrastan, At. G. No. 229/A/B, Village. Hirapur, Tq. Chalisgaon, Dist. Jalgaon | |
| 32. | 69/402/2022 | Jalgaon | Masjid and Madarsa Hazrat Bilal Razi. At. Mohammadiya nagar, Village. Shendurni, Tq. Jamner, Dist. Jalgaon | |
| 33. | 69/496/2022 | Jalgaon | Masjid Aaisha and Arbi Madarsa (tablig), Village. Jargaon, Tq. Pachora, Dist.Jalgaon | |

*टिप :- अ. क्र. १४ येथील दर्गाह हजरत जानुल्लाह शाह खानखा मस्जीद व कब्रस्तान जालना या वक्फ संस्थेची योजना वक्फ मंडळाच्या मान्यतेने मंजूर करण्यात आलेली आहे. सदर मंजूर योजनेतील Powers of Khuddam Managing committee :- या मथळ्याखालील मजकुर वक्फ अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने कलम ६५(४) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदर मजकुर वगळण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली उपरोक्त प्रकरणात मा. कोर्टाचे कोणतेही मनाई आदेश असल्याचे निदर्शनास आले नाही.

**ठराव क्रमांक ८:- वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार उपरोक्त व्यवस्थापन योजनाच्या प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त एकुण (३३) योजनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक. ९: - वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फा संस्थांच्या बदलाबाबत प्रस्तावांना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | File No. | District | Name of Waqf Institution |
|---|---|---|---|
| 1. | 42/279/2019 | Pune | Masjid , at Loni Kalbhor Tq. Haveli Dist Pune |
| 2. | 42/268/2022 | Jalgaon | Hazrat Sayed Abdul Razzak Shah Quadri wo Kabrastan, at Dhar Tq. Amalner Dist Jalgaon |
| 3. | 42/16/2022 | Pune | Rizwani Muslim Masjid Trust at New Mahatma Phule Peth, Pune |
| 4. | 42/645/2022 | Mumbai | Pir Baghdadi Dargah Dadar Trust, at Near Kabutar Khana, N.C. Kelkar Road, Dadar (w) Mumbai 400028 |

| Sr. No. | File No. | District | Name of Waqf Institution |
|---|---|---|---|
| 5. | 42/437/2019 | Raigad | Jamatul Muslimeen Sheerghear village Sheergher Tq. Murud Dist Raigad |
| 6. | 42/56/2020 | Mumbai | Masjid Mohammadi and Madarsa Arbiya at Shastri Nagar, Kalina Santacruz, Mumbai |
| 7. | 42/533/2021 | Mumbai | Anjuman Fida E Millat Trust, at F63/A, Kalsa Galli, AK Marg, Behram Nagar, Bandra East Mumbai |

उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली उपरोक्त प्रकरणात मा. कोर्टात कोणतेही वाद लवाद प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले नाही.

**ठराव क्रमांक. ९: - वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्राप्त झालेल्या उपरोक्त प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त एकुण (७) प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक १०:- वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये प्राप्त अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणे बाबत. (कलम २७ अन्वये)**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या वक्फ संस्थांच्या व्यवस्थापन बदला बाबतचे प्रस्ताव कलम ४२ अंतर्गत वक्फ मंडळास प्राप्त होत असतात. काही वक्फ संस्थांच्या व्यवस्थापना बाबत दोन किंवा दोन पेक्षा अधिक पक्षकारांकडुन दावा करण्यात येतो. तसेच काही वक्फ संस्थांच्या व्यवस्थापन बदल अर्जास आक्षेप प्राप्त होत असतात. त्यामुळे सदर आक्षेपांचे निराकारण करणे/वेळ प्रसंगी संबंधीतांची सुनावणी आयोजित करणे आवश्यक असते.

उपरोक्त नमुद कारणास्तव बहुतांश फेर बदल अर्ज वक्फ मंडळाकडे प्रलंबित आहेत. प्रलंबित अर्जांची संख्या अंदाजित ९०० असुन सुनावणीसाठी अंदाजित २५० प्रकरणे प्रलंबित आहेत. एवढी प्रलंबित प्रकरणे वक्फ मंडळा समोर ठेवणे/सुनावण्या आयोजित करणे यासाठी मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सबब, कलम ४२ अन्वये प्राप्त प्रस्तावांवर निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केल्यास प्रलंबित प्रकरणांवर तातडीने निर्णय घेणे शक्य होईल. वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २७ नुसार सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. १०: - महाराषट्र राज्य वक्फ मंडळाकडे अंदाजित किमान ९०० एवढी प्रलंबित प्रकरणे वक्फ मंडळा समोर ठेवणे/सुनावण्या आयोजित करणे यासाठी मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. सबब, कलम ४३ अंतर्गत दिनांक ३१.१२.२०२० पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व प्रलंबित फेरफार अर्जावर निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे. वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदर ठराव पारित करण्यात आला.**

## (सियानत विभाग)

**विषय क्रमांक ११:- सुन्नी जुमा मस्जीद ट्रस्ट, मंचर ता.अंबेगांव जि.पुणे च्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

**वक्फ संस्थेचा नांव व पत्ता : सुन्नी जुमा मस्जीद ट्रस्ट, मंचर ता.अंबेगांव जि.पुणे**
**अर्जदाराचे नांव :महंमद नाझिम कासम अली इनामदार रा. मंचअर ता.आंबेगांव जि.पुणे**

| अ.क्र | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | अर्जाची पडताळणी करण्यात आलेली आहे? | होय |
| २ | वक्फ संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत आहे? | MSBW/PUN/१७१/२००९ दिनांक १२/०८/२००९ |
| ३ | अर्जदार वक्फ संस्थेचा ट्रस्टी/सदस्य आहे? | होय |
| ४ | वक्फ मालमत्तेची नोंद महसुली अभिलेख ७/१२/नमुना नं.८/मालमत्ता पत्रक/म्यु घर नंबर इत्यादी मध्ये आहे? | सिटी सर्वे नं.७१९, ७२० |
| ५ | वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना मंजुर आहे? | होय |
| ६ | वक्फ संस्थेकडून ऑडिट/वक्फ फंड भरणा करण्यात आला आहे? | होय |
| ७ | वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्रस्तावित बांधकामासाठी ठराव घेतला आहे? | आहे |
| ८ | अर्जदार यांनी प्रस्तावित बांधकाम जागाचे फोटो सादर केले आहे? | आहे |
| ९ | प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ? | ४४०.४३ चौ.मि. (G+२ मस्जीद इमारत) |
| १० | प्रस्तावित बांधकामाचे स्वरुप | मस्जीद नवीन बांधकाम |
| ११ | प्रस्तावित बांधकामाचा आराखडा आहे? | आहे |
| १२ | प्रस्तावित बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च | रु.१,१३,२३,०००/- |
| १३ | बांधकामासाठी कर्ज वगैरे घेण्यात आला आहे? | कर्ज घेण्यात आला नाही. मस्जीदचे बांधकाम स्थानिक लोकांच्या चंदा वर्गणीतुन करण्यात येणार असल्याचे शपथपत्र वक्फ संस्थेचे अध्यक्ष श्री.गुलाम अली यांनी दिले आहे. |
| १४ | प्रस्तावित बांधकामासाठी सादर केलेले दस्ताऐवज खरे व बरोबर आहे याबाबत शपथपत्र दिले आहे? | आहे |
| १५ | अर्जदाराने नाहरकत प्रमाणपत्राची प्रोसेस फी भरणा केली आहे? | पावती क्र. ६७३७५ दिनांक ०१/०२/२०२३ |

उपरोक्त प्रकरणात अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.पी/एसएनटी/८२६/२०२२ दि.२७/१२/२०२२ अन्वये अहवाल सादर करुन सुन्नी जुम्मा मस्जीद चे नवीन बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ (१) (क) मधील तरतुदीनुसार वक्फचा संभाळ करण्यासाठी (जतन करण्यासाठी) देखभाल करण्यासाठी सर्वसाधारणपणे आवश्यक असतील ती सर्व कामे करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार "मस्जीद, दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लक्ष पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे."

उपरोक्त मस्जिद चे बांधकामाचा खर्च एक कोटी पेक्षा जास्त रकमेचा असल्याने सदर कामासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ मधील तरतुदीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. ११: - सुन्नी जुमा मस्जीद ट्रस्ट, मंचर ता.अंबेगांव जि.पुणे या वक्फ संस्थेच्या जागेतील मस्जिदचे पुनर्बांधकाम करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक १२:- आमखास ग्राऊंड, औरंगाबाद चे प्रति दिवस भाडे मध्ये सुधारणा बाबत.**

जामा मस्जिद, आमखास ग्राऊंड, औरंगाबाद येथे विविध कार्यक्रम व खेळ स्पर्धासाठी तसेच जाहिर सभा व लगन समारंभाचे आयोजन करण्यासाठी वक्फ मंडळाने प्रति दिवसाचे भाडे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने बैठक दि.१७ व १८ मे २०१७ रोजी ठराव क्रं. १९/२०१७ अन्वये निश्चित केलेले आहे. त्यानुसार खेळ स्पर्धासाठी प्रति दिवस रू. १०००/- व सामुहिक विवाह साहेळा व पार्किंगसाठी, धार्मिक व राजकिय, कार्यक्रम, जाहीर सभासाठी रक्कम रु.११,०००/- प्रति दिवस प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

वक्फ़ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ अन्वये व वक्फ़ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ सुधारित नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार बाजार मुल्यांकन प्रमाणे भाडे आकारणे आवश्यक असल्याने या वर्षी ईद बाजार भरविण्यासाठी बाजार मुल्यांकन प्रमाणे भाडे वसुल करण्यात आले आहे. त्यामध्ये वक्फ मंडळास २३,६०,०००/- इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

आमखास ग्राऊंड क्र. १ चे क्षेत्र अंदाजे ४एकर १२ गुंठे असून त्याचे बाजार मुल्यांकन प्रति चौ.मि.चे दर रू. २६,२५०/- इतके आहे. त्याचे २.५% या प्रमाणे प्रति दिवसचे भाडे रू.३०,३९५/- इतके येत आहे. सदर भाडे जास्त असल्याने तेथे सामने भरविणे शक्य होत नसल्याचे नमुद करुन केवळ क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यासाठी सवलतीच्या दरात आमखास ग्राऊन्ड भाडे तत्वावर मिळण्याची मागणी क्रिडा प्रमींकडुन करण्यात येत आहे.

आमखास ग्राऊंड हे मुस्लिम बहुल क्षेत्रामधील एकमेव ग्राऊंड असून त्यांना खेळासाठी दुसरे कोणतेही मैदान नाही, छोटे मोठे स्पर्धाचे आयोजन ते याच ग्राऊंड मध्ये करतात या मैदानात अनेक खेळाडु राज्यस्तरीय व राष्ट्रीयस्तरावर खेळले आहे, स्थानिक पातळी वरील खेळाडुचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आमखास ग्राऊंड येथे खेळ स्पर्धाचे आयोजन करण्यासाठी बाजार मुल्यांकन प्रमाणे प्रति दिवसचे भाडे निश्चित न करता प्रति दिवस रू. ३०००/- याप्रमाणे निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे.

वक्फ मंडळाने दिनांक १७ व १८ मे २०१७ रोजी मंजुर केलेल्या ठराव क्र. १९/२०१७ मध्ये सुधारणा करून आमखास ग्राऊंडचे प्रति दिवस भाडे खालील प्रमाणे निश्चित करणे उचित होईल.

| अनु क्र. | कार्यक्रम | जुने भाडे | चालु बाजार मुल्यांकन प्रमाणे प्रस्तावित प्रति दिवस भाडे |
|---|---|---|---|
| १ | खेळ स्पर्धा | रु १०००/- | रू. ३०००/- (खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी किमान दर) |
| २ | धार्मिक कार्यक्रम | रु २०००/- | रू.३०,३९५/- |
| ३ | शैक्षणिक कार्यक्रम | रु २०००/- | रू.३०,३९५/- |
| ४ | राजकिय जाहिर सभा | रु ११०००/- | रू.३०,३९५/- |
| ५ | एकल व सामुहिक विवाह सोहळा | रु ११०००/- | रू.३०,३९५/- |
| ६ | पार्किंग | रु ११०००/- | रू.३०,३९५/- |
| ७ | व्यवसायिक कार्यक्रम, आनंद नगरी, सर्कस, प्रदर्शनी, ईत्यादी. | या कार्यक्रमसाठी विचारपुस होत असते. | रू.३०,३९५/- |
| ८ | ईद बाजार, फुड बाजार | -- | प्रचलित नियमानुसार लिलाव/निविदा मागविण्यात यावे. |

**ठराव क्रमांक १२:-** **सदर प्रस्तावाबाबत चर्चा करुन मंडळाने खालीलप्रमाणे दर निश्चित केले आहेत -**

| अनु क्र. | कार्यक्रम | सुधारित दर (प्रति दिवस) |
|---|---|---|
| १ | खेळ स्पर्धा | रू. २०००/- (खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी किमान दर) |
| २ | धार्मिक कार्यक्रम | रू.२०,०००/- |
| ३ | शैक्षणिक कार्यक्रम | रू.२०,०००/- |
| ४ | राजकिय जाहिर सभा | रू.५०,०००/- |
| ५ | एकल व सामुहिक विवाह सोहळा | रू.३०,३९५/- |
| ६ | पार्किंग | रू.३०,३९५/- |
| ७ | व्यवसायिक कार्यक्रम, आनंद नगरी, सर्कस, प्रदर्शनी, ईत्यादी. | रू.५०,०००/- |
| ८ | ईद बाजार, फुड बाजार | प्रचलित नियमानुसार लिलाव/निविदा मागविण्यात यावे. |

**विषय क्रमांक १३:-**

**वक्फ मालमत्ता भाडयाने देण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देतांना संबंधीत वक्फ मालमत्ता भाडयाने घेण्याऱ्या भाडेकरू कडून देगणीची रक्कम निश्चित करणे बाबत घेण्यात आलेला ठराव मागे घेणेबाबत**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची बैठक दिनांक २५ व २६ जून २०२१ मध्ये खालील प्रमाणे (ठराव क्र. २७ )पारित करण्यात आला आहे.

"वक्फ मालमत्ता दीर्घ मुदतीकरिता भाडेपट्टयावर देण्याच्या वक्फ मंडळाची मान्यता/नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी (१) ३ वर्षापर्यंतच्या कालावधीच्या भाडेपट्टयासाठी ६ महिन्याच्या भाडया इतकी रक्कम, (२) ३ ते १० वर्षापर्यतच्या कालावधीच्या भाडेपट्टयासाठी १२ महिन्याच्या भाडया इतकी रक्कम भाडेपट्टा धारकाकडून वक्फ फंडासाठी देणगी म्हणून घेण्यात यावी. सदर देगणीची रक्कम ही वक्फ प्रॉपर्टी लीज रूल्स, २०१४ च्या नियम ८ मधील तरतूदी नुसार घेण्यात येणाऱ्या सुरक्षा अनामत (Security deposit) च्या रकमे व्यतिरिक्त असेल. "

केंद्रीय वक्फ अधिनियम, १९९५ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम,२०१४ मध्ये उपरोक्त प्रमाणे देणगी घेण्याची तरतुद नसल्याने उपरोक्त ठराव मागे घेणे बाबतचा विषय वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १३:- केंद्रीय वक्फ अधिनियम, १९९५ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम, २०१४ मधील तरतुदी विचारात घेता दिनांक २५/२६ जुन, २०२१ रोजीच्या बैठकीतील ठराव क्रमांक २७ मागे घेण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक १४: - वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२अ नुसार कारवाई/कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत.**

**वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५२-अ खालील प्रमाणे आहे.**

1) *Whoever alienates or purchases or takes possession of, in any manner whatsoever, either permanently or temporarily, any movable or immovable property being a waqf property, without prior sanction of the Board, shall be punishable with rigorous imprisonment for a term which may extend to two year:*

   *Provided that the waqf property so alienated shall without prejudice to the provisions of any law for the time being in force, be vested in the Board without any compensation therefor.*
2) *Notwithstanding anything contained in the Code of Criminal Procedure, 1973 (2 of 1974) any offence punishable under this section shall be cognizable and non-bailable.*
3) *No Court shall take cognizance of any offence under this section except on a complaint made by the Board or any officer duly authorized by the State Government in this behalf.*
4) *No Court inferior to that of a Metropolitan Magistrate or a Judicial Magistrate of the first class shall try any office punishable under this section.*

वक्फ मालमत्तांचा अनाधिकृत ताबा, खरेदी विक्री करण्यात आल्यास सदर गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र असुन त्यासाठी दोन वर्षांपर्यंत सश्रम कारावासाच्या शिक्षेची

तरतुद आहे. सदर गुन्हा करणा-या विरुध्द तक्रार दाखल करण्याचे अधिकार कलम ५२ अ नुसार मंडळास आहेत.

कलम ५२ अ अन्वये प्राप्त अधिकार प्रदान करणे बाबत वक्फ मंडळाने दि. १७.०५.२०२२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १७ खालील प्रमाणे पारीत केलेला आहे.

**"वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२ व ५२-अ नुसार वक्फ संस्थेची मालमत्ता पुर्नप्राप्त करण्यासाठी (Recovery) अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे. "**

प्रस्तुत प्रकरणी नमुद करण्यात येते की, वक्फ मालमत्तांच्या अनधिकृत खरेदी/ विक्री /अवैध ताबा केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधीतांविरुध्द पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यास/गुन्हा दाखल करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत संबंधीत जिल्हा वक्फ अधिकारी यांना कळविण्यात येते. त्यानुसार जिल्हा वक्फ अधिकारी यांच्या मार्फत गुन्हा नोंदविण्यात येतो. तथापि, अशा प्रकरणांमध्ये या पुर्वी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या न्यायालयीन प्रकरणामध्ये विरोधी पक्षाद्वारे जिल्हा वक्फ अधिका-यास गुन्हा दाखल करण्याचे अधिकार वक्फ मंडळाद्वारे दिले नसल्याचे नमुद केले जाते. सदर अधिकार फक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आल्यामुळे सदर कार्यवाही रद्दबातल व्हावी या बाबत न्यायालयात मागणी केली जाते.

सबब, कलम ५१, ५२ व ५२अ अंतर्गत तक्रारीची चौकशी करुन अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात यावे. तसेच, सदर चौकशीअंती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या लेखी आदेशानुसार संबंधीत पोलीस स्टेशन येथे तक्रार/गुन्हा दाखल करण्याचे अधिकार संबंधीत जिल्हा वक्फ अधिकारी यांना प्रदान करण्यात यावे असे प्रस्तावित आहे.

**ठराव क्रमांक १४:-** **वक्फ मंडळाने दि. १७.०५.२०२२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १७ मध्ये बदल करण्यात येत असून कलम ५१, ५२ व ५२-अ बाबत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे-**

" कलम ५१, ५२ व ५२अ अंतर्गत तक्रारीची चौकशी करुन अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदर चौकशीअंती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या लेखी आदेशानुसार संबंधीत पोलीस स्टेशन येथे तक्रार/गुन्हा दाखल करण्याचे अधिकार संबंधीत जिल्हा वक्फ अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत."

**विषय क्रमांक १५:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी वक्फ अधिनियम, १९९५, जमीन आणि महसूल संबंधित कायदेशीर बाबी हाताळण्यात तज्ञ असलेल्या कायदेशीर सल्लागार/फर्म/कंपनी ची नियुक्ती करण्यासाठी काढण्यात आलेली निविदेस प्रतिसाद मिळत नसल्याबाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी वक्फ अधिनियम, १९९५, जमीन आणि महसूल संबंधित कायदेशीर बाबी हाताळण्यात तज्ञ असलेल्या कायदेशीर सल्लागार/फर्म/कंपनी ची नियुक्ती करणेबाबत वक्फ कायदा, १९९५, जमीन आणि महसुल संबंधित बाबी, फौजदारी प्रकरणे, ट्रस्ट किंवा मंडळांना सल्ला देण्याचा व्यापक अनुभव असलेल्या सल्लागार/फर्म/कंपनीकडून ई-निवीदा माध्यमातुन निविदा मागविण्यात आले होते सदर निविदा दैनिक सकाळ मध्ये दि.३०/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते १५ दिवसाच्या मुदती मध्ये फक्त एकच निविदा प्राप्त झाली. शासन नियमाप्रमाणे किमान निवीदा प्राप्त न झाल्यामुळे सदरील निविदेस दि.२९/०५/२०२३ रोजी पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती. परंतु अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याने उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१/१२/२०१६ च्या शासन निर्णया नुसार दुसऱ्यांदा दि.०६/०६/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली व त्यानंतर १४/६/२०२३ आणि २२/६/२०२३ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली ४ वेळ मुदतवाढ दिल्यानंतर ही सदर निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. फक्त एक निविदाकाराने निवीदा भरली आहे.

उपरोकत प्रकरणात एकच निविदाकाराने निविदा भरली असल्याने त्याची निविदा उघडणे किंवा फेर निविदा मागविणे याबाबत वक्फ मंडळाच्या बैठकीत निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १५:-** **निविदेच्या अटी व शर्तींचा आढावा घेवून फेरनिविदा प्रसिद्ध करण्यात यावी.**

## (विधी विभाग)

**विषय क्रमांक १६:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ग केलेल्या प्रकरणात सुनावणी बाबत २ सिनियर अॅडव्होकेटची नियुक्तीस पुढील २ माहिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.**

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार वक्फ मंडळ कार्यालयाकडे अंदाजीत १९० याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर याचिका विहीत कालमर्यादेत निकाली काढण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. सदर कामासाठी मंडळास कायदेशीर सल्लागार म्हणून अॅड. ईकबाल हुसैन व अॅड. वहाब काझी यांची वक्फ मंडळाच्या बैठकी दि. २९ मे २०२३ ठराव क्र. (१४) अन्वये दि. ०१ मे २०२३ ते ३० जुन २०२३ पर्यंत (२) महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदर कामासाठी अॅड. ईकबाल हुसैन रुपये ६००००/- प्रतिमाह व अॅड. वहाब काझी रुपये ४००००/- प्रतिमाह अदा करण्यात येत असुन सदरहू नियुक्ती पुढील (२) माहिन्याच्या कालावधीसाठी वक्फ मंडळाच्या निर्णयासाठी सादर

**ठराव क्रमांक १६:-** **मंडळास कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. ईकबाल हुसैन व ॲड. वहाब काझी यांना ऑगस्ट २०२३ अखेरपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.**

## (ऑडिट विभाग)

**विषय क्रमांक १७ :- वक्फ संस्थाकडून घेण्यात येणा-या वार्षिक योगदानाबाबत (Annual Contribution)**

वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ७२ येथील तरतुदीनुसार वक्फ संस्थांकडून वार्षिक योगदान घेण्यात येते. मराठवाडा विभागातील वक्फ संस्थांकडून एकूण उत्पन्नाच्या वार्षिक ७ टक्के तर मराठवाडा वगळून इतर महसूली विभागातील (उर्वरित महाराष्ट्र) वक्फ संस्थांकडून एकूण वार्षिक उत्पन्नाच्या २ टक्के इतके वार्षिक योगदान (Annual Contribution) आकारले जाते. सदर आकारणी करतांना वक्फ संस्थांचे एकूण उत्पन्न विचारात घेण्यात येते. तथापि, वक्फ अधिनियमात एकूण उत्पन्ना एवजी निव्वळ उत्पन्नावर (Net Income) कमाल ७ टक्के वार्षिक योगदान (Annual Contribution) आकारणी करावयाची तरतूद आहे. सबब, संपुर्ण महाराष्ट्रातील वक्फ संस्थांसाठी निव्वळ उत्पन्नावर एकसमान Annual Contribution ची आकारणी करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या दि. २९.०५.२०२३ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला होता.

सदरहू प्रकरणावर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांनी दि. २९.०५.२०२३ रोजी ठराव क्र. १० खालील प्रमाणे पारीत केला आहेः-

**"सदर बदलामुळे वक्फ मंडळाच्या तिजोरीवर किती प्रभाव पडणार आहे याबाबत प्रथम सनदी लेखापालाचे (Chartered Accountant) मत घेण्यात यावे. "**

वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ७२ येथील तरतुद विचारात घेता संपुर्ण महाराष्ट्रातील वक्फ संस्थांसाठी निव्वळ उत्पन्नावर एकसमान Annual Contribution ची आकारणी करण्याबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या फेरविचारास्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १७:-**

**वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार वक्फ संस्थांच्या निव्वळ उत्पन्नावर वक्फ फंड घेणे आवश्यक असल्याने, कलम ७२ येथील तरतुदीनुसार संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील वक्फ संस्थांच्या निव्वळ उत्पन्नावर ७ टक्के इतके एकसमान वक्फ फंड (annual contributions) आकारण्यात यावे. सदर ठरावाची अंमलबजावणी हा ठराव पारित केल्याच्या दिनांकापासून करण्यात यावी.**

**दिनांक ३०.०८.२०२३ रोजी झालेल्या वक्फ मंडळाच्या बैठकीमध्ये सदर ठरावात खालील मुद्याचा समावेश करण्यात आलाः-**

**वक्फ संस्थांकडुन घेण्यात येणा-या वक्फ फंडाच्या रकमेवर १८% ची आकारणी करण्यात येते. वक्फ मंडळाकडे नोंदणीकृत संस्था धार्मिक (Religious) स्वरुपाचे कामकाज करतात. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे घेण्यात येणा-या शुल्कावर GST ची आकारणी करण्यात येत नाही. सदर विसंगती दूर करणे आवश्यक आहे.**

**सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत सविस्तर चौकशी करुन प्रस्ताव मंडळापुढे सादर करावा.**

**विषय क्रमांक १८:-**

**वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४४ अनुसार वक्फ संस्थांच्या वार्षिक अंदाजपत्रकांना मान्यता देणे बाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४४ येथील तरतुदीनुसार वक्फ संस्थांनी दरवर्षी वार्षिक अंदाज पत्रक वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक आहे. सदर अंदाज पत्रकामधील जमा/खर्च येथील बाबींमध्ये बदल करण्याचे वा त्या रद्द करण्याचे अधिकार वक्फ मंडळास आहेत. तथापि, सदर तरतुदीनुसार कोणत्याही वक्फ संस्थे मार्फत वार्षिक अंदाज पत्रक सादर करण्यात येत नव्हते. सबब, राज्यातील सर्व नोंदणीकृत संस्थांना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा मार्फत नोटीस बजाविण्यात आल्या असुन वक्फ संस्थांचे अंदजा पत्रके सादर करणे बाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त नोटीशीस अनुसरुन, राज्यातील १८० वक्फ संस्थांनी वार्षिक अंदाज पत्रके सादर केलेली आहेत. सदर अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १८:-** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४४ येथील तरतुदीनुसार प्राप्त १८० वक्फ संस्थांच्या वार्षिक अंदाज पत्रकांना मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक १९:-** **मदीना मस्जीद मौजे पुसद ता. पुसद जि. यवतमाळ या वक्फ संस्थेच्या मालकीच्या सर्वे नं. ५४/२(जुना सर्वे नं.१३२ ) बाबत**

मदीना मस्जीद मौजे पुसद ता. पुसद जि. यवतमाळ ही वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे मानिव नोंदणीकृत असुन तीचा नोंदणी क्र. MSBW/YTM/११३/२०१२ असा आहे. सदर वक्फ संस्थेच्या मालकीची १० एकर जमीन अवैधपने विक्री होत असल्याची तक्रार दि. २२.०७.२०२२ रोजी प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सदर जमिनीची होत असलेली अवैध खरेदी विक्री तात्काळ रद्द करण्याबाबत तहसिलदार, पुसद तसेच तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, पुसद यांना या कार्यालयाच्या दि. २७.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

या कार्यालयाच्या दि. २७.०७.२०२२ रोजीच्या पत्रा विरुध्द मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे वक्फ अर्ज क्र. ४२/२०२२ दाखल करण्यात आला. त्यामध्ये मा. न्यायाधिकरणांनी दि. १४.११.२०२२ रोजी अंतिम आदेश पारीत केले असून या

कार्यालयाचे दि. २७.०७.२०२२ रोजीच्या पत्र रद्द बात ठरविले आहे. तसेच तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संबंधीतांना सुनावणीची संधी देवुन निर्णय घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

मा. न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी दि. २७.०४.२०२३ व दि. १५.०६.२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समक्ष संबंधीतांची सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणी तसेच संबंधीतांनी सादर केलेले लेखी युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुत प्रकरणी खालील बाबी निदर्शनास येत आहेतः-

१. मदीना मस्जीद ही वक्फ संस्था बी-५० या क्रमांकाने धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत होती.
२. सदर वक्फ संस्थेची मालमत्ता सर्वे नं. १३२ येथे एकुण ३१ एकर २८ गुंठे इतकी होती.
३. सदर वक्फ संस्थेच्या मालकीची १० एकर जागा वक्फ संस्थेने दि. १४.०४.१९५९ रोजी विक्री केली.
४. सदर विक्री ही तत्कालीन मुंबई सार्वजनिक व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेउन करण्यात आलेली असल्याचे विक्री पत्रात नमुद करण्यात आलेले आहे.
५. सदर विक्री ही सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने सन १९५९ मध्ये करण्यात आलेली असल्याचे वक्फ संस्थेने दि. १३.०३.२०२३ रोजीच्या पत्रात नमुद केले आहे.
६. सदर वक्फ संस्थेच्या शेडयुल -१ चे अवलोकन केले असता, वक्फ संस्थेच्या एकुण ३१ एकर मालमत्तेमध्ये सन १९७७ मध्ये बदल करुन सुधारित मालमत्ता १२ एकर १४ गुंठे इतकी नमुद करण्यात आलेली आहे.
७. सदर बदल विचारात घेता सन १९५९ मध्ये वक्फ संस्थेच्या मालमत्ता विक्रीची नोंद धर्मदाय आयुक्त कार्यालयाने घेतलेली असल्याचे निदर्शनास येते.

उपरोक्त बाबी विचारात घेता नमुद करण्यात येते की, मदीना मस्जीद, पुसद या वक्फ संस्थेच्या मालकीच्या सर्वे नं. १३२/२ येथील १० एकर जागा सन १९५९ मध्ये सक्षम प्राधिका-याच्या पुर्व मान्यतेने झालेली असल्याचे तसेच सदर विक्रीची नोंद धर्मदाय आयुक्त कार्यालयाने सन १९७७ मध्ये घेतलेली असल्याचे दिसून येते. वक्फ अधिनियमातील कलम ११२ येथील तरतुदीनुसार धर्मदाय आयुक्त कार्यालयाच्या मान्यतेने (BPT Act १९५० नुसार) करण्यात आलेल्या कार्यवाहीस वक्फ अधिनियमाचे संरक्षण प्राप्त होते. सबब, सदर मालमत्तेची पुनश्च विक्री करण्यात आल्यास त्यामुळे वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदींचा भंग होत नाही. यास्तव या कार्यालयाकडे प्राप्त दि. २६.०७.२०२२ रोजीच्या तक्रारीत तथ्य आढळुन येत नाही.

उपरोक्त नमुद तक्रारी बाबत निर्णय घेण्यासाठी सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १९:-**

**सदर प्रकरणी सुनावणी घेण्यात आलेली असून धर्मादाय आयुक्त कार्यालयाने मालमत्ता विक्रीसाठी दिलेल्या आदेशाची प्रत सादर करणेबाबत सुनावणीदरम्यान संबंधितांना सूचित करण्यात आल्याचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले. तसेच सदर आदेशाची प्रत अद्यापही या कार्यालयास प्राप्त झालेली नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली. सदर बाब विचारात घेता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणातील सर्व कायेदशीर बाबी तपासून सदर विषय मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवावा.**

**(मा. सदस्या श्रीमती डॉ. फौजीया खान यांनी सुचविलेले विषय क्र. २० ते २९)**

**विषय क्रमांक २०:- परभणी येथील वक्फ संस्था तुराबुल हक्क दर्गाह बाबत**

तुराबुल हक्क दर्गाह येथे कार्यरत असलेले मुजावर श्री रंगे हे त्या ठिकाणी मनमानी कारभार करतात. त्यांना कोणताही अधिकार वक्फ मंडळाने दिलेला नाही. त्यांनी २००३ मध्ये जिल्हा वक्फ अधिकारी यांनी त्यांना नोटीस दिली होती. त्या विरोधात त्यांनी उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रीट याचीका क्र ५३०६/२००३ दाखल केली होती. त्यात अंतरीम संरक्षण त्यांनी मिळवून घेतले. पुढे या प्रकरणात काहीच कार्यवाही झाली नाही. आखेरीस २०१४ मध्ये उच्च न्यायालयाने या प्रकरणात याचीकाकर्ताने योग्य त्या न्यायासनाकडे दावा करावा अशी संधी देऊन प्रकरण विल्हेवाट लावले. त्यात त्यांनी ४ आठवडयाची मुदत घेऊन त्या काळात संरक्षण मागीतले व न्यायालयाने ते दिले. पुढे श्री रंगे यांनी दिवाणी न्यायाधीश परभणी येथे दिवाणी दावा क्र २१४/२०१४ दाखल केला. त्यात श्री वहीदोद्दीन व इतर यांनी त्रयस्त (third party) पक्षकार म्हणून अर्ज दाखल केला. तो दिवाणी न्यायाधीशानी मंजुर करुन त्यास पक्षकार म्हणून दाखल करुन घेतले. या आदेशा विरुध्द श्री रेंगे यांनी परत उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रीट याचीका क्र. ३३७६/२०१५ दाखल केली. व यात दिवाणी न्यायाधीशानी कार्यवाही करु नये यासाठी संरक्षण घेतले. प्रकरण २०१५ पासून उच्च न्यायालयात सुरु झाले. त्यात ३ तारखा झाल्या त्यानंतर प्रकरण तारखेवर नाही. अशा प्रकरणात पुढील तारीख नसल्याने संरक्षण संपते असे अभीप्रेत आहे. याबाबत वक्फ मंडळ कार्यालयातील विधी शाखेत संपर्क केला व ही पुर्ण माहीती त्यांना दिली आहेत. या प्रकरणात उच्च न्यायालयात तसेच दिवाणी न्यायालयात योग्य ती बाजु मांडून मुजावर यांची मनमानी कमी करणे अत्यंत आवश्यक आहे.

तसेच याच संस्थे करीता मुंतजीम म्हणून श्री अशरफ कादरी यांना नेमले आहे. त्यांचे करीता कार्यालय स्थापन करणे आवश्यक आहे. परंतु ही जागा श्री रेंगे ही जागा त्यांची खाजगी आहे असे सांगून तेथे त्यांना अडचण निर्माण करतात. तसेच वक्फ मंडळाने या दर्गाह वर दानपेटी ठेवण्यासाठी आदेश दिले. त्याचे अंमलबजावणी करु देत नाहीत. ही जमीन वक्फ मालमत्ता असल्याचे शासन राजपत्र दिनांक ०२.०५.१९७४ मध्ये स्पष्ट उल्लेख आहे. अशा परिस्थीतीत मंडळाने या प्रकरणाबाबत सखोल चौकशी करुन मोहीम स्तरावर हे प्रकरण हाताळावे. यासाठी बैठकीत चर्चा होऊन यावर निर्णय व्हावा.

**ठराव क्रमांक २०:- सदर प्रकरणी विधि शाखेचे अभिप्राय घेवून त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावेत.**

**विषय क्रमांक २१:- तुराबुल हक्क दर्गाह विकास आराखडा अमलबजावणी करीता तत्वतः देणे**

परभणी शहरात तुराबुल हक्क दर्गाह असून हा दर्गाह सर्व धर्मीयाचे आदराचे स्थान आहे व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. या दर्गाहचे एकाच ठिकाणी जवळपास ४५ एकर जागा आहे. दर वर्षी फेब्रुवारीच्या महीन्यात येथे मोठा उसे भरतो यावर्षी या उसांतून वक्फ मंडळास नवळपास २.२५ कोटीचा लाभ झाला आहे. या दर्गाहचे जागेवर विकास आराखडा तयार केला आहे. या विकास आराखड्याचे अंमलबाजावणी करीता मंडळाची तत्वतः मंजुरी मिळाल्यानंतर विकास आराखडयामध्ये विकास कामे करण्याकरीता वेगवेगळया विभागास प्रस्ताव पाठवून निधी मिळवता येईल. व्यापरी संकुलास PPP तत्वावर निधी उपलब्ध करता येऊ शकतो. यामधुन वक्फ मंडळास नियमित उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होऊ शकतो. त्यामुळे यासाठी मंडळाचे समेत ठेवून हा आराखडा अंमलबजावणीसाठी तत्वतः मान्यता देण्यात यावी.

**ठराव क्रमांक २१:- मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रस्तावाची तपासणी करुन त्यावर वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.**

**विषय क्रमांक २२:- परभणी येथील उस्मानीया मस्जीद या वक्फ संस्थेच्या जागेमध्ये विकास आराखडा अमलबजावणी करणे साठी तत्वत: मान्यता देणे.**

परभणी येथील उस्मानीया मस्जीद फार जुनी असुन लोकांचे मनात त्याबाबत आदर आहे. ही उस्मानिया मस्जीद रेल्वे स्टेशन समोर जिल्हा न्यायालयास लगत आहे. हो वक्फ संस्था मंडळाचे नियंत्रणात आहे. या जागेवर व्यापारी संकुल व इतर विकास आराखडयात नमुद कामे केल्यास वक्फ मंडळास मोठे उतपन्न होऊ शकते. यातून वक्फ मंडळाची प्रतीमा उज्वल होवु शकते. यासाठी मंडळाची तत्वतः मान्यता देण्याबाबत चर्चा करुन निर्णय द्यावा.

**ठराव क्रमांक २२:- मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रस्तावाची तपासणी करुन त्यावर वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.**

**विषय क्रमांक २३:- विवाह नोंदणी बाबत कार्यपध्दती आखने.**

विवाह नोंदणीचे अर्ज व प्रमाणपत्रातून मोठी रक्कम अपेक्षीत आहे. दरवर्षी ५० हजार विवाह होतात. प्रत्येक विवाह नोंदणी फार्मची किंमत २०० रु ठेवल्यास २०० x ५०,००० = १०,००००००/- या विवाहाची नोंदणी प्रमाणपत्र देण्याची तरतुद ठेवल्यास प्रती नोंदणी साठी १५०० रु फीस या पैकी ५०० रुपये काजीस व १००० रुपये वक्फ मंडळास मिळण्याची तरतुद केल्यास यामधुन साधारणतः ५०,००० x १००० = ५०००००००० रुपये उत्पन्न होवू शकते. आपण यापैकी २५ टक्के जरी गृहीत धरले तरत १.२५ कोटी येवु शकतात व काजीना ५०० x ५०००० = २५००००००० रुपये मिळू शकतात. याप्रमाणे उत्पन्नाचा स्त्रोत वाढविता येवु शकतो. या माध्यमातून गाव स्तरापर्यंत वक्फ मंडळाची संबंध (attachment) निमार्ण होऊ शकते. त्यामुळे यावर चर्चा होऊन निर्णय घ्यावा.

**ठराव क्रमांक २३:-** **सदर प्रस्तावाची तपासणी करुन त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आवश्यक तो निर्णय घ्यावा.**

**विषय क्रमांक २४:- लावणी.**

ज्या वक्फ जमीनी शासनाने ताब्यात घेतल्या आहेत व त्या जमीनी शासन मार्फत लावणी बोलोने देतात. त्या रक्कमा मंडळास येत नाहीत. या जमीनी शासनाकडे म्हणजेच तहसीलदार यांचेकडे आहे. त्या जमीनी वक्फ मंडळाचे ताब्यात घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे त्यासाठी शासन स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाठपुरावा कराव. व शासनाकडून सर्व महसुल अधिकाऱ्यांना तसे निर्देश काढण्यासाठी महसुल विभागाकडे संदर्भ करावा, वक्फ मंडळाचे लावणी करताना बोली पारदर्शकपणे होत नाही. गत वर्षी परभणीत पारदर्शकपणे बोली केली तेव्हा त्यात ३ पट वाढ झाली. त्यामुळे लावणी करते वेळी पारदर्शकता ठेवावी. लावणी ही ३ साठी आहे. बोली करीता आता पासुन पारदर्शक पध्दत अवलंबल्यास प्रस्तावीत ५० लक्ष चे ठिकाणी १ कोटी उत्पन्न कमीत कमी होवू शकते. याबाबत प्रमाणभुत कार्यपध्दत (SOP) ठरवुन द्यावी याबाबत चर्चा होऊन निर्णय घ्यावा.

**ठराव क्रमांक २४:-** **शेतजमिनी लावणी/भाडेपट्ट्यावर देण्यासाठी** प्रमाणभुत कार्यपध्दत (SOP) तयार करुन ती मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावी.

**विषय क्रमांक २५:- वक्फ मालमत्ता भाडे नियम २०१४ ची अमल बजावणी करण्याकरता भाडे निर्धारण व संकलन कक्ष स्थापन करणे बाबत.**

वक्फ मंडळास आर्थीक सक्षम करण्याकरीता वक्फ मालमत्तेचे भाडे मधुन प्राप्त होणारे महसुल अत्यंत महत्वाचे आहे. सद्या हे भाडे खुप जुन्या दराने व नाममात्र आकारणी केल्या जाते. ज्या मालमत्ता वक्फ मंडळाचे नियंत्रणात आहे त्याचे भाडे तसेच मुतवल्लीचे ताब्यात असलेल्या वक्फ संस्थाचे मालमत्ताचे भाडे मधुन भाडे आकारणी २०१४ नियमानुसार होत नसल्याने मंडळास मोठा आर्थीक फटका बसत आहे. यापुढे वक्फ मालमत्ते भाडे हे वक्फ मालमत्ता लीज नियम प्रमाणे निर्धारीत करावे. तसेच २०१४ पासुन त्याची अमलबजावणीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामुळे मंडळाचे स्तरावर एक "भाडे निर्धारक व संकलक असा कक्ष असावा. यामध्ये राज्यातील सर्व ठिकाणचे शिघ्र सिध्द गणक उपलब्ध असतील व राज्यातील ज्या ज्या जिल्हा वक्फ अधिकारी यांनी विचारणा केली त्या क्षेत्राचे दर निर्धारण करुन दिले जातील. यासाठी संगणकीय अॅपचा वापर करण्यात येईल. असे संगणकीय अॅप साधारण ५ लाख ची तरतुद करण्यात यावी. हे संगणकीय अॅप उपलब्ध करुन घेतल्यास वक्फ मंडळाकडे त्याचे नोंदीही राहतील. कमी दराने आकारणी होणार नाही. वसुलीही वेळचे वेळी होईल. यासाठी नोटीस काढणे, मागणी करणे वसुल भरणा करणे याचीही सोय संगणका मार्फत करता येईल. तसेच वक्फ संस्थाचे मुतवल्लो वा वक्फ संस्थाचे लेखा परिक्षण व अंदाजपत्रक तपासतानाही याची मदत होईल. त्यामुळे याबाबत चर्चा करुन वक्फ मंडळ स्तरावर एक "भाडे निर्धारक व संकलक" असा

कक्ष निर्माण करुन त्यावर भाडे निर्धारक व संकलक हया नावाचे पद निश्चीत करण्यात यावे तसेच वक्फ मंडळाचे या वसुलीचे व आकारणीचे कामा करीता संगणकीय अँप घेण्यास मान्यता देण्यात यावी असा ठराव मंजूर करण्यात यावा.

**भाडे.**

भाडे हे जुन्याच दराने घेतल्यामुळे ते या वर्षी १.८० कोटी अंदाज पत्रकावरील उध्दीष्ठामध्ये प्रस्तावीत आहे. जे की फार कमी आहे. ते कमीत कमी प्रत्येक जिल्हयातून सरासरी ६० लक्ष वार्षीक होवू शकते. म्हणजेच यातून २१ कोटी रुपये अपेक्षीत आहेत.

१०X१० फुटाचे दुकान कमीत कमी २००० रुपये भाडयाने जाते म्हणजेच १० चौ. मीटर करीता २००० तर प्रती चौ.मी. २०० रुपये भाडे येते.

प्रत्येक जिल्हयात वक्फ मंडळाचे ताब्यात असलेल्या जागे पैकी ५ एकर (२०,००० चौ.मी.) जागा भाडयावर असतीलच यापैकी दुकाने केवळ ५००० चौ. मीटर भाडयावर X दर २०० रुपये १०,००,००० याप्रमाणे प्रती महीना १० लक्ष अपेक्षीत आहे. काही ठीकाणी कमी जास्त गृहीत धरले तरीही ५ लक्ष प्रती महीना प्रमाणे वर्षा करीता ६० लक्ष एक जिल्हा या प्रमाणे राज्यातील ३५ जिल्हया करीता ३५ X ६० लक्ष २१ कोटी रुपये अपेक्षीत आहे. या २१ कोटी पैकी या पहिल्या वर्षी नव्यानेच असल्यामुळे १५ कोटीचा अंदाज ठरवू या.

**ठराव क्रमांक २५:-**

**वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम, २०१४ मधील तरतुदींचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना वक्फ संस्थांना देण्यात याव्यात. तसेच वक्फ मंडळाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या संस्थांतील भाडेकरुंसंदर्भात सदर नियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.**

**दिनांक ३०.०८.२०२३ रोजी झालेल्या वक्फ मंडळाच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे सुधारित ठराव पारित करण्यात आलाः-**

**सदर विषय आगामी बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक २६:-** **वक्फ मालमत्ताचे अधिकार अभिलेख ७/१२ वर तसेच आखीव पत्रीका (PR card) वर आणि नगर परिषदा, मनपा व ग्रामपंचायत मधील मालमत्ता रजीस्टर वर वक्फ संस्थाच्या नोंदी घेणे बाबत**

महाराष्ट्र शासनाने सन २०१० मध्ये परिपत्रक काढून सर्व देवस्थानाच्या जमीनीवर इतर खाजगी लोकांची आलेली नावे कमी करुन त्यावर देवस्थानची नावे नोंदण्याची मोहीम घेतली होती. त्यानंतर २०१६ मध्ये शासन निर्णय काढून वक्फ संस्थाचे जमीनीवर नोंदी घेण्यासाठी आदेश दिलेत. त्यानंतर अप्पर मुख्य सचिव अल्पसंख्याक यांनी २०२२ मध्ये पत्राद्वारे सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांनी हे काम तात्काळ पूर्ण करावे यासाठी निर्देश दिले. परंतु अजुनही वक्फ संस्थांची नावे ७/१२ वर, PR card वर तसेच ग्रामपंचायत. म.न.पा... नगर परिषदामध्ये मालमत्ता रजिस्टर वर आली नाहीत. यासाठी वक्फ मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विभागीय आयुक्तांकडे होणारे नियमित्त जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांचे महसुल अधिकारी बैठकीत हा विषय

ठेवून त्याबाबत आढावा घेण्यासाठी बोलविण्यात यावे असी विभागीय आयुक्त यांना कळविण्यात यावे व त्यांचे कढील बैठकीत हा विषय ठेवून याबाबत नियमीत्त आढावा घेतल्यास हे काम पूर्ण होवू शकेल. याबाबत सभेत चर्चा होऊन तसे ठरविण्यात यावे. यासाठी महसुल सचिव व सर्व विभागीय आयुक्तांना तसे लेखी कळविण्यात यावे.

**ठराव क्रमांक २६:-** **महसुल आयुक्तांकडे होणा-या महसुल अधिका-यांच्या आढावा बैठकीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आमंत्रित करणेबाबत संबंधितांना पत्र पाठविण्यात यावे.**

**विषय क्रमांक २७:-** **रोशन खान मस्जीद योजना मंजुरी करणे**

या मस्जीदचे दोन मुतवल्लीमध्ये वाद असल्यामुळे सदर संस्थेचे देखभाल होत नाही. मस्जीदची दैनंदीन कामकाज व या वक्फ संस्थेचे कामकाज करण्यासाठी एक योजना दाखल केली आहे. तो योजना मंजुर करणे आवश्यक आहे. यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात यावा.

**ठराव क्रमांक २७:-** **सदर वक्फ संस्थेच्या योजना मंजुरीचा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक २८:-** **वक्फ संस्था मस्जीद चौक औरंगाबाद योजना मंजुर करणे**

औरंगाबाद येथे मस्जीद चौक औरंगाबाद ही वक्फ संस्था आहे. या वक्फ संस्थेची योजना मंडळात दाखल केली आहे. तो मंजुर करणे आवश्यक आहे. यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यातयावा.

**ठराव क्रमांक २८:-** **सदर विषय वगळण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २९:-** **मस्जीद-ए-खीजरा मदरसा अरबीया अरफरातुल उलुम ता. जि. परभणी वक्फ संस्था नोंदणी करणेबाबत.**

**ठराव क्रमांक २९:-** **वक्फ संस्थेच्या नोंदणीच्या कागदपत्रांची छाननी करुन त्याबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.**

## (भांडार/खरेदी)

**विषय क्रमांक ३०:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळासाठी नविन मोटर वाहन खरेदी करणे बाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या दिनांक ०९/०९/२०२० रोजी झालेल्या बैठकीत सन्माननीय सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या करिता एक टोयोटा इन्नोवा तसेच स्टाफ कार म्हणून मारुती इरटीगा, ही दोन नविन मोटार वाहने खरेदी करण्याचे सुचविले

आहे. एकाच वेळी दोन वाहने खरेदी करणे खर्चीक ठरणार असल्याने तुर्तास केवळ एक मोटार वाहन मारुती ईर्टिगा खरेदी करण्यास वक्फ मंडळाच्या दि. २०.१०.२०२० रोजीच्या बैठकीत ठराव पारीत करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे संपुर्ण राज्याचा कार्यभार असुन मंडळाकडे केवळ दोनच वाहने आहेत. त्यापैकी एक वाहन १० वर्षापेक्षा जास्त कालावधीचे असल्याने सदर वाहन निर्लेखीत करणे आवश्यक आहे. सदर बाबी विचारात घेता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा करिता यापुर्वी झालेल्या चर्चेस अनुसरुन टोयोटो इन्नोवा हे नविन वाहन खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर

**ठराव क्रमांक ३०:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळासाठी टोयोटो इन्नोवा हे नविन वाहन खरेदी करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.**

## (संकीर्ण/लेखा)

**विषय क्रमांक ३१:-** **मस्जीद अख्तरी बीड या वक्फ संस्थेच्या इमामांचे मानधन अदा करणे बाबत.**

श्री. सईद खान रूस्तम खान, इमाम मस्जिद अख्तरी, बीड यांनी अर्ज देऊन त्यांना देय असलेल्या हदियाची थकबाकी अदा करणेस विनंती केली आहे. प्रकरणात असे की, श्री. हाफीज मोहम्मद बशीरोद्दीन हे पूर्वी मस्जिद अख्तरी, बीड येथे इमामतची खिदमत अदा करित होते. जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांचे अहवाल क्रमांक २००/१३ दिनांक: १८.०४. २०२३ नुसार मस्जिद अख्तरी बीड येथे इमाम म्हणून हाफीज अब्दुल रहमान पि. हाफीज मोहम्मद बशीरोद्दीन यांची नियुक्ती या कार्यालयचे आदेश क्रमांक ३७८९/२०१३ दिनांक २७.०६.२०१३ अन्वये करण्यात आली. जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांचे अहवाल क्रमांक ४९१ १४ दिनांक १३.०५.२०१४ नुसार माहे मे, २०१४ पासून श्री. हाफीज अब्दुल रहेमान यांचा हदिया बंद करण्यात आला होता. करण की, जिल्हा वक्फ अधिकारी यांनी त्यांचे अहवाल असे सादर केले होते की, मुसल्लीयान श्री. हाफीज अब्दुल रहेमान यांची इमामत स्विकारत नाही. श्री. अब्दुल रहेमान यांनी मा. वक्फ न्यायाधिकरण येथे दावा क्रमांक २७/२०१५ दाखल केला. सदर दावा वक्फ न्यायाधिकरण यांनी त्यांचे आदेश दिनांक १३.०८.२०१८ अन्वये रद्द केला. जिल्हा वक्फ अधिकारी बीड यांनी त्याचे अहवाल क्रमांक ५३८/२०२० दिनांक २६.१०.२०२० अन्वये सादर केले की, श्री. अब्दुल रहमान यांचा दावा मा. वक्फ न्यायाधिकरण यांनी रद्द केला असून, श्री. सईद खान रूस्तम खान हे मस्जिद अख्तरी बीड येथे विना मोबदला इमामची खिदमत अदा करित आहे. सदर अहवालानुसार या कार्यालयाचे आदेश क्रमांक ७६४/२०२३ दिनांक २३.०२.२०२३ अन्वये श्री. सईद खान रूस्तम खान यांची नियुक्ती मस्जिद अख्तरी बीड येथे इमाम म्हणुन माहे मार्च २०२३ पासुन प्रभावाने करण्यात आली आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ३१:-** **श्री. सईद खान रूस्तम खान हे मस्जिद अख्तरी बीड येथे सन २०१३/२०१४ पासून विनामोबदला इमामत करीत असल्याने त्यांची पुर्वलक्षी प्रभावाने इमाम म्हणून नियुक्ती करण्यास तसेच इमामत साठी त्यांना अनुज्ञेय असलेले मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

## मा. अध्यक्ष महोदय यांच्या मान्यतेने चर्चेस घेण्यात आलेले विषय

**विषय क्रमांक ३२:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुंबई येथे क्षेत्रिय कार्यालय सुरु करणेबाबत**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे कार्यक्षेत्र संपुर्ण राज्यात असून मुख्यालय औरंगाबाद जिल्ह्यात आहे. वक्फ मंडळाच्या विविध कामांसाठी/बैठकांसाठी मंडळाचे मा. अध्यक्ष / मा. सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सातत्याने मुंबई येथे यावे लागते. तथापि, मुंबई जिल्ह्यात वक्फ मंडळाचे क्षेत्रित कार्यालय नसल्याने मा. अध्यक्ष / मा. सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वक्फ मंडळाशी संबंधित काम करण्यासाठी कार्यालय उपलब्ध नाही. त्यामुळे मुंबई येथे वक्फ मंडळाचे सुसज्ज क्षेत्रिय कार्यालय सुरु करण्याची सुचना मा. अध्यक्ष महोदय यांनी मांडली. सदर सूचनेस सर्व सन्माननिय सदस्यांनी अनुमोदन दिले

**ठराव क्रमांक ३२:-** **मंडळाच्या मुंबई येथील विभागीय कार्यालयासाठी भाड्याने जागा शोधून भाडेकरार करण्यास मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. प्रति महिना रु. ५ लाख या मर्यादेत भाडेकरार करणेस व त्या अनुषंगाने अनामत रक्कम अदा करुन भाडेकरारनामा करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी/ उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. विभागीय कार्यालयासाठी फर्निचर/अन्य साधनसामग्री यासाठी रु. २० लाख पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर देण्यात यावी. तद्नंतर सदर खर्चास मंडळाची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी. सदर बाबीवर होणारा खर्च शासनाकडून वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी प्राप्त होणा-या रकमेतून भागविण्यात यावा.**

**विषय क्रमांक ३३:-** **वक्फ संस्थांकडून जमा करण्यात येणा-या वक्फ फंडवरील विलंब शुल्कात सवलत देणेबाबत**

ठराव क्रमांक ३३:- थकबाकी प्रलंबित असलेल्या राज्यातील वक्फ संस्थाकडून दिनांक ३०.०९.२०२३ पर्यंत वक्फ फंड (Annual Contribution) रकमेचा भरणा करण्यात आल्यास, त्यांना आकारण्यात येणा-या विलंब शुल्कात ७५ टक्के सूट देण्यात यावी.

ठराव क्रमांक ३४:- बैठकीचे इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न पाहता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त ठरावांची अंमलबजावणी करावी.

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | |
| २ | श्री. सय्यद इम्तियाज जलील<br>मा. लोकासभा सदस्य तथा सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ३ | डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. राज्यसभा तथा सदस्या, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ४ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ५ | मा. फारुख अन्वर शाह,<br>मा. विधान सभा सदस्य तथा मा. सदस्य, म.रा.व.मं. औरंगाबाद | अनुपस्थित |
| ६ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ७ | मा. शेख हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ८ | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| | | |
| | श्री. मो. बा. ताशिलदार<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | |